REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

*" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख १२ जुलै, १९५० | अंक २८

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

### युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**संयुक्त राष्ट्रसंघासाठी इमारत**—संयुक्त राष्ट्रसंघाच्या जनरल असेंब्लीची इमारत बांधण्यासाठी १·१ कोटी डॉलर्स खर्च करण्यांत यावयाचे आहेत. ही इमारत न्यू मॅनहटन येथें बांधण्यांत येणार आहे. इमारतीच्या बांधकामाच्या करारावर संयुक्त राष्ट्रसंघातर्फे सेक्रेटरी ट्रिग्वीली यांनीं सही केली.

**उत्पन्नासाठी नवे कर**—वढवान नगरपालिकेनें उपाहारगृहामधील खुर्च्या आणि बाकें ह्यांवर कर बसविण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें दुकानांच्या पाट्यांवरही कर बसविण्यांत आला आहे. खुर्चीमागें दरमहा ८ आणे आणि बाकामागें दरमहिना १ रु. कर घेण्यांत येणार आहे. दुकानाच्या पाट्यांवर दर चौरस फुटामागें ३ रुपये वार्षिक कर घेण्यांत येणार आहे.

**जुन्या कपड्यांचा नवा उपयोग**—मुंबई सरकारनें आपल्या पट्टेवाल्यांच्या व कैद्यांच्या जुन्या कपड्यांपासून हस्तव्यवसायानें बनविलेला टिपकागद वापरण्याचें ठरविलें आहे. हे जुने कपडे नष्ट न करतां राखून ठेवण्यांत यावे अशी आज्ञा सर्व खात्यांना देण्यांत आली आहे.

**शिक्षणाच्या माध्यमाबद्दल असंतोष**—सागर विद्यापीठानें आपल्याशीं जोडलेल्या कॉलेजांतून शिक्षणाचें माध्यम म्हणून हिंदी भाषेला मान्यता दिली आहे. विद्यापीठाच्या ह्या निर्णयामुळें विद्यार्थ्यांत असंतोष पसरला आहे. नागपूर विद्यापीठानें हिंदी अगर मराठी न जाणणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं इंग्लिशच शिक्षणाचें माध्यम म्हणून मान्य केली आहे.

**अमेरिकेला घंटांची निर्यात**—भारतांतून अमेरिकेला घंटांची निर्यात मोठ्या प्रमाणांत होऊं लागली आहे. मुरादाबाद येथें होणाऱ्या घंटा सर्व जगांत उत्तम प्रकारच्या ठरल्या आहेत. जेवणाची सूचना देणाऱ्या घंटांपासून ते चर्चला लागणाऱ्या मोठ्या घंटांपर्यंत सर्व प्रकारच्या घंटांसाठीं अमेरिकेकडून सारख्या मागण्या येत आहेत. गेल्या महिन्यांत मुरादाबादहून १,००,००० रुपयांच्या घंटा निर्यात करण्यांत आल्या. सध्याच्या डॉलर टंचाईच्या काळांत ह्या व्यापाराचें महत्त्व विशेष आहे.

**मद्रास राज्यांतील सावकारी व्यवहार**—मद्रास सरकारनें आपल्या राज्यांतील सावकारीच्या व लहानसहान वस्तूंच्या गहाणावरच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवण्यासंबंधीं कायदा करण्याचें ठरविलें आहे. ह्या कायद्याप्रमाणें बँका व सहकारी संस्थांशिवाय इतर सावकारांना परवान्याशिवाय धंदा करतां येणार नाहीं. परवाना फी २५ रुपये ठेवण्यांत येईल. वस्तू गहाण ठेवून २५ रुपये अगर त्यापेक्षां कमी रक्कम कर्जाऊ दिल्यास व्याजाचा दर ९$\frac{3}{8}$ टक्के घेतां येईल. बाकीच्या व्यवहारासाठी ६$\frac{1}{4}$ टक्के कमाल दर ठरविण्यांत येईल.

**म्हैसूरची अन्नधान्याची मागणी**—म्हैसूर सरकारनें मध्यवर्ती सरकारकडे ५०,००० टन अन्नधान्याची मागणी केली आहे. शहरांतील नागरिकांचें अन्नधान्याचें प्रमाण रोजीं एक औंसानें वाढवितां यावें म्हणून ही मागणी करण्यांत आली आहे.

**जुन्या ग्रंथांचें प्रकाशन**—राजस्थान संस्थान संस्कृत मंडळानें कांहीं प्राचीन संस्कृत हस्तलिखितांचें प्रकाशन करण्याचें ठरविलें आहे. ह्या हस्तलिखितांत १३० व्या शतकांतील एका व्याकरणाचें हस्तलिखित आहे. भाषेच्या विकासासंबंधीं ह्या ग्रंथांत कांहीं माहिती मिळण्याचा संभव आहे.

**१९५० च्या बॉण्डसूची परत फेड**—१९५० च्या ३$\frac{1}{2}$ टक्के व्याजाच्या दराच्या कर्जांपैकीं उरलेलें कर्ज ता. १५ जुलै रोजीं परत करण्यांत येणार आहे. त्या तारखेनंतर कर्जावर व्याज देण्यांत येणार नाहीं.

**टाइपरायटर्सचा कारखाना**—मुंबई शहरांत टाइपरायटर्स तयार करणारे दोन कारखाने निघणार आहेत असें समजतें. सध्यां एक कारखाना सध्या पोलादाचें फर्निचर बनविणारी एक कंपनी काढणार आहे. दुसरा इटालियन कंपनी काढणार आहे. भारतांत टाइपरायटर्स तयार करणारे हे पहिलेच कारखाने आहेत.

**चहाच्या उत्पादनावर कर**—ता. १ जुलै १९५० पासून पाकिस्तानांत तयार झालेल्या चहावर दर १०० पौंडामागें १ रु. ६ आणे कर घेण्याचें पाकिस्तान सरकारनें जाहीर केलें आहे.

**सिलोनची रिझर्व्ह बँक**—सिलोनमध्यें ता. १ जुलैला रिझर्व्ह बँकेची स्थापना करण्यांत आली. ह्या बँकेचे गव्हर्नर मि. जॉन एक्स्टर हे अमेरिकन तज्ज्ञ आहेत. सिलोन आणि ब्रिटनमधील गंगाजळीसंबंधींच्या कराराची मुदत संपली असून नव्या कराराच्या वाटाघाटी चालू आहेत.

**उत्तर प्रदेश सरकारची बचत**—कानपूरच्या रेशनिंग कचेरींतील खालच्या प्रतीच्या ३२ टक्के नोकरांना कामावरून दूर करण्यांत येणार आहे. सर्व नोकर तात्पुरते म्हणून घेण्यांत आले होते. कपातीमुळें उत्तर प्रदेश सरकारचा खर्च १,२०,००० रुपयांनीं कमी होईल.

**अन्नधान्याची आयात**—जून २९ रोजीं संपलेल्या आठवड्यांत भारतांत परदेशाकडून ६५,९०० टन अन्नधान्य आयात करण्यांत आलें. जानेवारी १९५० पासून जून अखेरपर्यंत भारतानें ७,६६,२०० टन अन्नधान्याची आयात केली. त्यांपैकीं ६,३१,९०० टन गहू आणि ७७,३०० टन तांदूळ आले.

**ब्रिटनमध्यें तेलासाठीं शोध**—अँग्लो-इराणियन ऑईल कंपनीनें सुमारें १४ वर्षांपूर्वी ब्रिटनमधील भूमिगत तेलाचा शोध करण्यास सुरवात केली. खुद्द तेलाचें उत्पादन फारसें झालें नसलें तरी ब्रिटनच्या खनिज संपत्तीसंबंधीं महत्त्वाची माहिती मिळाली आहे. १९४३ सालीं ब्रिटननें १,१३,७०० टन तेल निर्माण केलें. तेलाच्या उत्पादनांत ब्रिटनचा हा उच्चांक आहे. इंग्लंड आणि स्कॉटलंडच्या निरनिराळ्या भागांत ४०० तेलाच्या विहिरी खोदण्यांत आल्या आहेत.

**मलायांतील मुलें बंडखोरांची हस्तक ?**—मलायांतील बंडखोरांच्या हालचालीसंबंधीं मुलांना जितकी माहिती असते तितकी गुप्तपोलिस खात्यालाही नसते, असें मत सिंगापूरच्या गुप्त पोलिसांनीं व्यक्त केलें आहे. शाळांतील मुलें बंडखोरांना बातम्या आणि अन्न पुरवतात असें आढळून आलें आहे. ह्या परिस्थितीमुळें १७ वर्षांवरील मुलांमुलींना शाळेंतच स्थानबद्ध करण्यासंबंधीं कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १२ जुलै, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ठाकूरदास कमिटीचा अहवाल

### सध्याच्या घडीस निष्कारण धक्का न देण्याचें धोरण

सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आलेल्या रूरल बँकिंग चौकशी कमिटीचा अहवाल मार्च, १९५० पूर्वींच, अंदाजपत्रकाचे आधीं, प्रसिद्ध व्हावयाचा होता. अद्यापहि तो प्रसिद्ध झालेला नाहीं. तथापि, त्याचा अनधिकृत सारांश प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून कमिटीनें सध्याच्या पद्धतींत फार बदल करणाऱ्या सुधारणा सुचविलेल्या आढळत नाहींत. खेडेगांवी प्रदेशांतून, मुख्यतः त्यांतील पैसेवाल्या वर्गाकडून, बराच पैसा बँकिंगचे क्षेत्रांत आणता येण्याजोगा आहे असें कमिटीस आढळून आलें. परंतु, त्यांत तात्काळ फारसें यश येईल, असें कमिटीस वाटत नाहीं. व्यापारी बँकांनीं आपल्या शाखा तालुक्याच्या ठिकाणीं उघडाव्यात, अशी कमिटीची शिफारस आहे. परंतु त्यांना त्यासाठीं प्रत्यक्ष मदत ( उदाहरणार्थ, सबसिडी, किमान धंद्याची गॅरंटी, विशिष्ट संस्थेस प्राधान्य, इ. ) देण्यास तिचा विरोध आहे. लहान खेड्यांतील बँकिंगच्या प्रसाराचें काम सहकारी बँका आणि पोस्टाच्या सेव्हिंग्ज बँका ह्यांचेवरच कमिटीनें सोपविलें आहे. ट्रेझरीचें काम सहकारी बँकांकडे देऊं नये, असें कमिटीचें स्पष्ट मत आहे. पोस्टाच्या सेव्हिंग्ज बँकांच्या व्यवहारांत बरीच सुधारणा करता येण्याजोगी आहे. त्याच्या चौकशीचें काम एकाद्या तज्ज्ञ अधिकाऱ्याकडे सोपवावें, असें कमिटीनें सांगितलें आहे. गाडगीळ कमिटीच्या शिफारसी अंमलांत आणण्याचे कामीं सावधगिरीची आवश्यकता कमिटीनें प्रतिपादन केली आहे. सध्याच्या सावकारी पद्धतीच्या जागीं दुसरी सोईची योजना न करतां, कायद्यानें चालू घडी विघडविण्यास कमिटीचा विरोध आहे. लहान लोकवस्तीच्या ठिकाणच्या बँक कचेऱ्यांस इंडास्ट्रिअल ट्रायब्यूनलचे निवाडे व गुमास्ता कायद्यांतील कलमें हीं लागू असूं नयेत, अशी कमिटीची सूचना आहे. ट्रेझरीचें काम सध्याप्रमाणेंच चालू रहावें, परंतु त्याबाबत इंपीरिअल बँकेनें आपलें कार्यक्षेत्र वाढवावें, अशी कमिटीची इच्छा आहे. ह्या नव्या कामास इंपीरिअल बँकेस किती मोबदला मिळावा ह्याविषयीं ती बँक व रिझर्व्ह बँक ह्यांचेमध्यें नवा करार करावा लागेल. पांच वर्षांनीं ह्या प्रश्नाची पुनः तपासणी व्हावी, असा कमिटीचा अभिप्राय आहे.

रूरल बँकिंग चौकशी कमिटीच्या अहवालाच्या वरील आराखड्यावरून बँकिंगच्या प्रसाराचे कामीं जाणूनबुजून घाई करण्यांत अर्थ नाहीं, खेडेगांवांतील कांहीं पैसा जमा करतां येणें शक्य असलें तरी तें तात्काल होण्याजोगें काम नाहीं. बँकिंगचा व्यवसाय खेड्यापर्यंत पोचविण्याजोगी आजची स्थिती नाहीं, ट्रेझरीचें काम पूर्ववतच चालू रहाणें इष्ट आहे, इत्यादि मुद्दे स्पष्ट होतात. भरमसाट सुधारणा सुचवून त्या अमलांत आणण्यासाठीं मोठाल्या रकमा खर्चण्याचा सरकारला आग्रह करण्याचें सोइस्कर धोरण कमिटीनें अंगीकारलेलें नाहीं. सध्यांची घडी बिघडवूं न देतांच बँकिंगचा जरूरीप्रमाणें हळूहळू प्रसार होणें इष्ट आहे, त्यांत जबरदस्तीस वाव नाहीं, हें कमिटीच्या शिफारसींचें सार आहे. कमिटीपुढील साक्षीदारांपैकीं ज्या तज्ज्ञांचे स्वतःचे हितसंबंध विशिष्ट संस्थांत गुंतलेले नव्हते, अशांच्या मताशीं कमिटीचा रिपोर्ट जुळता आहे, ही गोष्ट सहज लक्षांत येईल.

---

## भारताचें राष्ट्रीय उत्पन्न

भारत सरकारच्या आर्थिक सल्लागारानें भारताच्या ( यूनियन मधील प्रांतांच्या ) राष्ट्रीय उत्पन्नाचा ताजा ( १९४६–४७ चा ) अंदाज नुकताच प्रसिद्ध केला आहे, त्यावरून त्यावर्षीं २४ कोटी, ४४ लक्ष लोकसंख्येचें एकूण उत्पन्न ५५८० कोटी रुपये झालें. म्हणजे, दर माणशीं वार्षिक उत्पन्न २२८ रुपये पडलें. १९४५–४६ मधील तेच आकडे ४९९३ कोटी रुपये व दरमाणशीं उत्पन्न २०४ रुपये असें होतें. एका वर्षांत दर माणशीं वार्षिक उत्पन्न २४ रुपयांनीं वाढलें असें दिसलें, तरी त्याच काळांत वाढलेली महागाईहि लक्षांत घेतली पाहिजे. घाऊक किंमतींचा निर्देशांक २४४·९ वरून २७५·४ वर गेला, ह्याचा अर्थ १९४५–४६ च्या किंमतींच्या मानानें दर माणशीं उत्पन्न न वाढतां उलट तें १९९·५ रुपयांच्या पातळीवरच गेलें असें म्हणतां येईल. उत्पन्नाच्या आकड्यांत वाढ न होतां, तें २८·५ रुपयांनीं उतरलें असेंच म्हणावें लागेल. एका वर्षांत लोकसंख्येमध्यें पडलेली भर आणि औद्योगिक तंट्यांमुळें उत्पादनास आलेल्या अडचणी, ह्यांचा हा परिणाम असला पाहिजे. १९४८–४९ संबंधीं कांहीं कच्चे आकडे दिले आहेत, त्यावरून ह्या वर्षीचें राष्ट्रीय उत्पन्न ६९६८ कोटी रुपये धरण्यांत आलें असून दरमाणशीं उत्पन्न २७२ रु. पडेल असा अंदाज करण्यांत आला आहे. तो वस्तुस्थितीस धरून आहे, असें मानलें तरी इतर देशांशीं तुलना करतां आपलें दरमाणशीं उत्पन्न अत्यल्प असल्याचें दिसून येतें. ऑस्ट्रेलिया, ग्रेट ब्रिटन, स्वित्झरलंड, कॅनडा, इत्यादि देशांत तें २००० ते ४००० रुपये असून अमेरिकेंत तें ७३०० रु. आहे. १९४६–४७ मधील लोकांच्या उत्पन्नाची शहरी व खेडेगावी अशी वाटणी केली; तर ती खालीलप्रमाणें होईल:—

| | मिळवते लोक ( लक्ष ) | एकूण उत्पन्न ( कोटी रु. ) | दरमाणशीं उत्पन्न ( रु. ) |
|---|---|---|---|
| खेडेगांवें | ८७१ | ३४८३ | ४०१ |
| शहरें | १८८ | २१०७ | ११२१ |

शहरांतील मिळवत्या माणसाचें उत्पन्न खेड्यांतील माणसाच्या उत्पन्नाचे मानानें सुमारें तिप्पट आहे, ही गोष्ट वरील तक्ता स्पष्ट करील आणि शेतीचें उत्पन्न तातडीनें वाढविण्याचें अगत्य नजरेस आणून देईल.

---

## शेतकीविषयक आंकडेवारींत सुधारणा

### नातू समितीच्या शिफारशी

१९५०–५१ सालीं होणाऱ्या शेतकीविषयक जागतिक खानेसुमारीसंबंधानें चौकशीचा तपशील तयार करण्यासाठी भारत सरकारनें गेल्या वर्षीच्या एप्रिलमध्यें नेमलेल्या समितीचा शेतकीविषयक आंकडेवारींतील समन्वयाबाबतचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला असून त्यांत भारतांतील शेतकीविषयक आंकडेवारी भक्कम पायावर आधारण्याबाबतच्या सविस्तर उपायांसंबंधीं सूचना करण्यांत आल्या आहेत. भारत सरकारच्या शेतकी खात्यांतील आर्थिक आणि आंकडेविषयक सल्लागार श्री. डब्ल्यू. आर. नातू हे या समितीचे अध्यक्ष होते.

शेतजमीन आणि उत्पन्न या दोन्हींसंबंधींची आंकडेवारी जमविण्याच्या पद्धतींत या अहवालांत सुधारणा सुचविण्यांत आल्या आहेत. एकरांसंबंधींची आंकडेवारी निश्चित ठरविण्यासाठी सर्व सर्व्हे नंबर पुन: देण्यांत यावेत अशी शिफारस अहवालांत आहे. रँडम सॅम्पलिंगची पद्धत ही गणना पूर्ण करण्याच्या दृष्टीनें महत्त्वाची असली तरी ती सर्वस्वी ग्राह्य मानतां येणार नाहीं.

अजून ज्या विभागांची हक्कनोंदणीचे दृष्टीनें मोजणी झालेली नाहीं त्यांची ताबडतोब तशी मोजणी करण्यांत यावी आणि ती पुरी होईपर्यंत माहिती मिळविण्याची योग्य अशी व्यवस्था करावी असें अहवालांत सुचविलेलें आहे.

दरसाल गोळा करण्यांत येणाऱ्या मुख्य पिकांच्या उत्पन्नाची आंकडेवारी शेतांतील निवडक नमुने घेण्याच्या पद्धतीनें करण्यांत यावी. सध्यां उत्पन्नाचे अंदाज करण्यांत येणाऱ्या, त्याचप्रमाणें अंदाज न करण्यांत येणाऱ्या सर्व पिकांना ही पहाणी लागू करण्याच्या आवश्यकतेवरही अहवालांत भर दिलेला आहे. शेतकऱ्याच्या ताब्यांतील जमिनीबाबतची माहिती गोळा करणें, आंकडेवारी जमविण्यासाठी प्रमाणित मूळ पद्धतीचा उपयोग आणि राज्यांत निरनिराळ्या पातळीवर स्थापन करावयाच्या संघटनेचा प्रकार इत्यादि इतर विषयांवरहि अहवालांत शिफारशी केल्या आहेत. भारतांतील एकूण ७८ कोटी, १० लक्ष एकर जमिनींपैकीं सध्यां फक्त सुमारें ५५ कोटी, ७० लक्ष एकर जमिनींची शेतकीविषयक आंकडेवारी उपलब्ध आहे. बाकीच्या २९ टक्के विभागाची आंकडेवारी अजून मिळालेली नाहीं. ही उपलब्ध माहितीहि निरनिराळ्या राज्यांत एकाच प्रकारची किंवा विश्वासनीय म्हणतां येईल अशी नाहीं.

शेतकीविषयक योजना आंखण्याचे दृष्टीनें आज बिनचूक आंकडेवारीची फार मोठी गरज आहे हें निदर्शनास आणून सदरहू अहवालांत आंकडेवारींतील पुढील दोष दाखविले आहेत. (१) माहिती गोळा करतांना गळणाऱ्या गोष्टी. (२) व्याख्या आणि वर्गीकरण यांतील सुसूत्रतेचा अभाव. (३) तक्त्यांतील दोष (४) सुरवातीची माहिती गोळा करण्याच्या पद्धतींतील दोष. (५) देखरेख आणि पहाणी यांतील दोष आणि (६) नियोजन आणि सुसूत्रता यांतील दोष.

प्राथमिक माहितींत चुका राहाण्याचें एक प्रमुख कारण खेडेगांवांतील पाटलाच्या कामांतील भरमसाट वाढ हें एक आहे. पाटील हा खेड्यांतील एकुलता एक अधिकारी असल्यामुळें त्याला योग्य प्रकारें शेतकीविषयक आंकडेवारी गोळा करण्यास फार थोडा वेळ सांपडतो. शेतकीविषयक आंकडेवारींत सुधारणा करावयाची असल्यास पाटलावरील कामाचा बोजा कमी करणें हा एक महत्त्वाचा उपाय आहे असें अहवालांत सुचविलेलें आहे.

### टाटा ऑईल मिल्स कं. लि. चा अहवाल: उद्बोधक आकडे

टाटा आईल मिल्स कं नें ३१ मार्च, १९५० असेरच्या वर्षी ३ कोटी, ५० लक्ष रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली. गेल्या वर्षापेक्षां विक्री ७ लाखांनीं अधिक झाली, कारण कपडे धुण्याच्या साबणाची विक्री वाढली तरी अंगास लावण्याच्या साबणाची विक्री मात्र कमी झाली. कारण भारतांतील ह्या साबणाचें उत्पादन मागणीपेक्षां जास्त होऊं लागलें आहे. कोकोजेम आणि पकाव ह्यांची विक्रीहि कमी झाली. त्यांच्या डब्यांस लागणाऱ्या पत्र्याच्या तुटवड्यामुळें उत्पादन होऊनहि तें बाजारांत पाठवतां आलें नाहीं. कंपनीच्या उत्पादनास लागणाऱ्या कच्च्या मालाच्या (खोबरेल, भुईमुगाचें तेल, मोहाचें तेल) किंमती भरमसाट वाढल्या आहेत. कंपनीचें वसूल भांडवल सुमारें १५ लक्ष रु. असून तिचा रिझर्व फंड १० लाखांचा आहे. घसारा फंड ५४ लाखांचा आहे. कंपनीनें इंपिरियल बँकेकडून ८२ लक्ष रु. कर्जाऊ घेतले आहेत, त्यास मॅनेजिंग एजंट गॅरंटॉर आहेत. डायरेक्टरांच्या फी खातीं फक्त १,९०० रु. पडले आहेत. कंपनीस ३,२९,८६९ रु. निव्वळ नफा झाला. ऑर्डिनरी भागांस ४% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

### सोलापूर गिरणीची व्यवस्था सरकारकडे देणारा ऑर्डिनन्स हायकोर्टानें कायदेशीर ठरवला

गव्हर्नर जनरल ऑफ इंडियानें ९ जानेवारी १९५० रोजीं सोलापूर स्पिनिंग आणि ॲण्ड वीव्हिंग कं. लि. बाबत एक आर्डिनन्स काढला त्या अन्वयें मुंबई सरकारनें कंपनीच्या डायरेक्टरांचे जागीं सर विठ्ठल चंदावरकर प्रभृति पांच डायरेक्टरांची नेमणूक केली. ह्या डायरेक्टरांनीं ७ फेब्रुवारी १९५० च्या एका सर्क्युलर ठरावानें प्रत्येक प्रेफरन्स शेअरवर ५० रु. कॉलची मागणी केली. त्याप्रमाणें श्री. द्वारकादास श्रीनिवास ह्यांच्याकडे १,६२,०० रुपयांची मागणी आली. त्यांनीं मुंबई हायकोर्टांत कंपनी, तिचे सरकारनियुक्त डायरेक्टर्स व युनियन सरकार ह्यांचे विरुद्ध दावा आणून ऑर्डिनन्स बेकायदा ठरवला जावा, डायरेक्टरांना कॉलचे पैसे मागण्याचा अधिकार नाहीं, ७ फेब्रुवारीचा ठराव वादींवर बंधनकारक नाहीं, अशा अर्थाच्या निवाड्याची मागणी केली. परंतु हायकोर्टानें सर्व व्यवहार कायदेशीर असल्याचें सांगून वादीचा दावा खर्चासह काढून टाकला.

### हस्केल घाणीची सुधारलेली आवृत्ति

नूतन घाणी या नांवाची एक नवीन तेलघाणी लौकरच मुंबई राज्यांत सुरू होईल. ही नवीन घाणी म्हणजे हस्केल घाणीची सुधारलेली नवीन आवृत्ति असून ती पुण्याच्या ग्रामोद्योग प्रयोगशाळेंत तयार करण्यांत आली आहे.

नूतन घाणीची किंमत हस्केल घाणीच्या मानानें बरीच कमी असून तिची कार्यक्षमता मात्र हस्केल घाणीइतकीच आहे. याशिवाय नव्या घाणीच्या रचनेंत कांहीं सुधारणा केल्यामुळें तिच्यांत लहान लहान आकारांच्या बॉल बेअरिंगचा वापर करतां येतो. हस्केल घाणीसाठी मोठ्या आकाराचे बॉल बेअरिंग लागतात.

सुरुवातीस पुण्याच्या ग्रामोद्योग प्रयोगशाळेंत ४० नूतन घाण्या तयार करण्यांत येतील, आणि त्या ग्रामोद्योग समित्या, सर्वोदय केंद्रें, तेल्यांच्या संस्था आणि ट्रेड तेली यांना देण्यांत येतील.

### कल्याण पीपल्स को. बँकेची नवी शाखा

कल्याण पीपल्स को. बँकेच्या स्टेशनकडील शाखेचा उद्घाटन समारंभ दि. १ जुलै रोजीं ठाण्याचे कलेक्टर श्री. जसजित सिंग ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला.

पुणें सिटी म्युनिसिपल कॉर्पोरेशन

# ३½ टक्के डिबेंचर लोन्स

१. रुपये ३० (तीस) लाखांचें पुणें म्यु. डिबेंचर लोन १९५०–६५
( मुद्दल व व्याज या दोहोंची हमी मुंबई सरकारनें घेतली आहे. )

२. रुपये १४,३२,९०० चें पुणें म्युनिसिपल ट्रॅन्सपोर्ट अंडरटेकिंग डिबेंचर लोन १९५०–६०

हीं दोन्हीं कर्जें उभारण्याचे बाबतींत हमी ( अंडर राईट ) मिळाली आहे.

कर्जांचे अर्ज स्वीकारण्याच्या तारखा १२ जुलै ते १४ जुलै १९५० अशा आहेत.
मात्र आवश्यक तेवढ्या कर्जाची रक्कम उभी राहिल्यास नोटीस दिल्याशिवाय
त्यापूर्वी केव्हांहि अर्ज स्वीकारणें बंद करण्यांत येईल.

दर १०० रुपये दर्शनी लोनची किंमत १०० रुपये राहील.

प्रत्येक डिबेंचर दर्शनी ५०० रुपयांचें किंवा ५०० रुपयांच्या पटीचें राहील.

जरुरीपेक्षां जास्त रक्कम जमा झाल्यास कॉर्पोरेशन आपल्या सोयीनें प्रमाणशीर वांटप करील आणि जास्त आलेली रक्कम बिनव्याजीं परत करील.


अर्ज आणि रकमा इंपिरियल बँक ऑफ इंडियाच्या खालीं नमूद केलेल्या कचेऱ्यांतून स्वीकारल्या जातील व त्या ठिकाणीं अर्जाचे नमुने व अधिक माहिती दिली जाईल:—

मुंबई हेड ऑफिस, पुणें कँप, पुणें शहर, अहमदाबाद, अहमदनगर, बेळगांव, देवळाली, हुबळी, हैद्राबाद ( दक्षिण ), नाशिक आणि सोलापूर.

जा. क्र. ६५
म्युनिसिपल कॉर्पोरेशन कचेरी,
विश्रामबाग वाडा.
ता. १ जुलै १९५०

**स. गो. बर्वे,**
म्युनिसिपल कमिशनर,
पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन.







## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी　२ डाळीची गिरणी　३ उसाचे चरक
४ चक्क्या　५ गोल करवत (लाकडें कापण्याकरितां)　६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

जी. जी. दांडेकर मशिन
वर्क्स लिमिटेड
भिवंडी　जि. ठाणें
व्हाया-कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे )





—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ
दमडेरे वोळाजवळ,
पुणें २.

## विलीन दक्षिणी संस्थानांतील बँकांच्या सवलती

### मुंबई सरकारचें योग्य धोरण

विलीन झालेल्या दक्षिणी संस्थानांतील बँकांच्या अडचणींचा सामुदायिकपणें विचार करून त्या अडचणी सरकारपुढें पद्धतशीरपणें मांडाव्या आणि त्यांस पूर्वीच्या सवलती चालू ठेवण्याचें अगत्य पटवून द्यावें, ह्या दृष्टीनें त्या बँकांच्या प्रातिनिधींची एक प्रातिनिधिक परिषद दि. २६-९-१९४९ रोजीं श्री. म. व्यं. शिंगरे ह्यांचे दिवाणखान्यांत रावबहादुर श्री. व्ही. यारगोप (बुधगांव बँक) ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. परिषदेनें कांहीं ठराव मंजूर केले आणि नंतर उपस्थित प्रतिनिधींबरोबर अर्थमंत्री ना. वैकुंठराय मेहता ह्यांनीं त्याबाबत चर्चाहि केली श्री. शिंगरे, रावसाहेब खोले, इत्यादींनीं ह्याबाबत जो पुढाकार घेतला व संघटितपणें बँकांच्या अडचणी मांडल्या, त्यास यश येऊन मुंबई सरकारनें बँकांच्या सवलतीबाबत आपलें धोरण त्यांस आतां कळविलें आहे.

(१) विलीन झालेल्या संस्थानांतील बँकांमध्यें पूर्वीच्या सरकारनें शेअर रूपानें जें भांडवल गुंतविलें होतें तें भांडवल संस्थानें विलीन झाल्यामुळें मुंबई सरकारकडे वर्ग झालें आहे. तें भांडवल लोकांना विकण्याकरतां म्हणून मुंबई सरकारनें जो ठराव केला आहे तो सदर बँकांवरील लोकांचा विश्वास कायम ठेवण्याचे दृष्टीनें स्थगित करावा आणि आपलें भांडवल तसेंच बँकांमध्यें राहूं द्यावें, अशी परिषदेनें सरकारला विनंती केली होती. त्याप्रमाणें ३१ मार्च, १९५२ पर्यंत हें आपलें भांडवल बँकांत तसेंच कायम ठेवण्यास सरकारनें मान्यता दिली आहे. त्यानंतर त्या शेअर्सचें काय करावयाचें, त्याचें धोरण पुढें ठरविलें जाईल. जोपर्यंत सरकारचे शेअर्स बँकांत रहातील, तोपर्यंत नियमाप्रमाणें त्याला जेवढे डायरेक्टर नियुक्त करतां येतील तेवढे सरकार करीत राहील. कांहीं बँकांत ऑडिटर नेमण्याचा हक्कहि सरकार पूर्वीच्या संस्थानीं सरकारांप्रमाणें बजावील.

(२) पूर्वीच्या संस्थानी सरकारनें बँकांना बँकांची तिजोरी वगैरे सरकारी खजिन्यांत ठेवण्याबाबत अगर अन्य रीतीनें ज्या सवलती दिल्या होत्या त्या त्याच स्वरूपांत शक्य असेल तेथें मुंबई सरकारनें चालू ठेवाव्या, अशीहि परिषदेनें सरकारला विनंती केली होती. ज्या ठिकाणीं सरकारी जागेंत बँकेच्या कचेऱ्या आहेत, त्या तेथेंच, योग्य भाड्यावर, रहाण्यास मुंबई सरकारची हरकत नाहीं असें मुंबई सरकारनें कळविलें आहे. बँकांच्या तिजोऱ्या वगैरे बाबत सरकारी खजिन्यांत ठेवण्यासंबंधीं ज्या सवलती होत्या, त्याहि ३१ मार्च, १९५२ अखेर चालू रहाणार आहेत. सहकारी सोसायट्यांना ज्या अटींवर ह्या सवलती मिळतात, त्याच अटी बँकांसही लागू होतील.

(३) संस्थानांमध्यें शेतकरी ऋण विमोचना संबंधीं कायदा अस्तित्वांत नव्हता. त्यामुळें विलीन झालेल्या संस्थानांतील बँकांनीं पुष्कळ शेतकऱ्यांना कर्जें दिलेलीं आहेत, परंतु आतां संस्थानें विलीन झालेमुळें १९४७ चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतचा कायदा लागू झालेला आहे. त्या योगानें शेतकऱ्यांना दिलेलीं कर्जें वसूल होण्याच्या बाबतींत अडचणी निर्माण होऊन बँकांचें नुकसान होत आहे व होणार आहे म्हणून को-ऑपरेटिव्ह सोसायट्या आणि शेड्यूल्ड बँका सदर कायद्याचे तिसऱ्या कलमाप्रमाणें वगळण्यांत आल्या आहेत, त्याप्रमाणेंच या विलीन झालेल्या संस्थानांतील बँकांना वगळल्याबद्दल सदरहू कायद्यांत दुरुस्ती करावी अगर अन्य कायदेशीर उपाय त्वरित योजावे अशी परिषदेनें सरकारला विनंती केली होती. संस्थानांच्या विलीनीकरणापूर्वीच्या कर्जाबाबत तरी निदान संस्थानी बँकांना प्रस्तुत कायद्यांतून वगळण्यांत यावें, ह्या मागणीकडे सरकार तांतडीनें लक्ष देत आहे असें सरकारचें उत्तर आलें आहे.

(४) ज्या संस्थानांतील बँकांनीं पूर्वीच्या संस्थानीं सरकारला कर्जें दिलीं आहेत अगर संस्थानी सरकारच्या ट्रेझरींत रकमा डिपॉझिट ठेवल्या आहेत त्या रकमा परत मिळण्याच्या बाबतींत फार दिरंगाई होत आहे. म्हणून, या रकमा लहान व्याजानें दिलेल्या असल्यामुळे बँकाचें नुकसान होत आहे आणि दैनंदिन व्यवहारांत नवीन बँकिंग कायद्याप्रमाणें भांडवल कमी पडत आहे. करितां सदर रकमा त्वरित त्या त्या बँकांना परत कराव्यात ही मागणी सरकारनें मान्य केली आहे. अशा रकमांचा तपशील सरकारनें मागविला आहे. ज्या रकमा बँकांस देणें असतील, त्या सरकार तावडतोब देण्याची व्यवस्था करील. बँकांनीं याबाबत सरकारला तपशील कळवावा.

(५) संस्थानी सरकारांकडून संस्थानें विलीन होण्यापूर्वी संस्थानीं बँकांकडे निरनिराळ्या ठेवी ठेवण्यांत येत असत. त्याप्रमाणें जेथें तालुका ट्रेझरीज आहेत आहेत त्या ठिकाणीं स्टेट बँका असतील तर त्यांच्याकडे पूर्वीप्रमाणेंच ठेवी ठेवाव्यात, ही परिषदेची विनंती सरकारनें अमान्य केली आहे.

वरील हकीकतविरून, संस्थानी बँकांच्या बाबतींत मुंबई सरकारनें अत्यंत सहानुभूतीनें धोरण ठेवलें आहे, हें दिसून येईल. परिषदेच्या सर्व प्रमुख मागण्या सरकारनें मान्य केल्या आहेत, ह्यामुळें विलीन संस्थानांतील बँकांच्या चालकांना निश्चित समाधान वाटेल. योग्य रीतीनें आपल्या अडचणी पुढें मांडल्या म्हणजे बिकट वाटणारे प्रश्न कसे सुटूं शकतात ह्याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. परिषदेच्या बाबतींत पुढाकार घेणारांचें त्यांच्या संघटनाचातुर्याबद्दल आणि मुंबई सरकारचें त्याच्या योग्य धोरणाबद्दल आम्हीं अभिनंदन करतों.

### ३० डिसेंबर रोजीं बँकांना सुट्टी

बँकांना आपला वार्षिक हिशोब पुरा करतां यावा म्हणून मुंबई सरकारनें शनिवार ता. ३० डिसेंबर १९५० या दिवशीं बृहन्मुंबईत आणि पुणें, अहमदाबाद, नाशिक, देवळाली, सुरत, बलसाड, भडोच, सोलापूर, नडियाद, गोध्रा, धुळें, जळगांव, बेळगांव, हुबळी, गदग, कोल्हापूर व बडोदें शहरांत बँकांना सुट्टी जाहीर केली आहे. उपरोक्त शहरांतील सरकारी कचेऱ्या त्या दिवशीं अर्थातच चालू रहातील.

### सहकारी जगत्

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट आणि महाराष्ट्र विभाग सहकारी शिक्षण मंडळ ह्यांचें मुखपत्र "सहकारी जगत्" या त्रैमासिकाचा पहिला अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे. सक्तीचा सहकार (ले. अभ्यासु), सहकारी चळवळ, तिची वाढ व आजची उपयुक्तता (श्री. म. द. खाडिलकर), सर्वोदयाचें तत्त्वज्ञान (श्री. म. धों. विद्वांस), औद्योगिक सहकाराचें अर्थशास्त्र (श्री. जे. बी. टेलर), भारताचा अन्नधान्याचा प्रश्न (डॉ. ना. वि. कानिटकर), इत्यादि लेख त्रैमासिकांत आले आहेत.

**कामगारांना पगारी रजा**—१९४९ सालीं अमेरिकेमधील बिगर शेती कामगारांपैकीं ३,६०,००,००० ते ३,८०,००,००० कामगारांना पगारी रजा देण्यांत आल्या, असें अमेरिकेच्या कामगारविषयक खात्यानें जाहीर केलें आहे.

## मुंबईमधील गिरणी कामगारांना बोनस

**२ कोटी, १६ लक्ष रुपये वांटण्यांत येणार**

मुंबईमधील ६० गिरण्यांतील सुमारें २ लक्ष कामगारांना मिळून १९४९ सालाकरितां दोन महिन्यांच्या प्राप्तीइतका म्हणजे २ कोटी, १६ लक्ष रुपये बोनस मुंबई इंडस्ट्रिअल कोर्टानें देवविला आहे. हिरजी, रघुवंशी, कुलाबा लँड व मून ह्या चार गिरण्यांना त्या वर्षी तोटा झाला होता, म्हणून त्यांतील १०,००० कामगारांना बोनस मिळणार नाहीं. राहणीच्या खर्चाचे मानानें कमी पडणारी मिळकत भरून यावी आणि गिरण्यांच्या नफ्यांत योग्य मागीं मिळावी म्हणून पुरेशा बोनसची मागणी कामगार संघांनीं केली होती, तिला गिरणी मालक संघानें विरोध केला होता. गिरण्यांचें वसूल भांडवल १९४९ सालीं २०.९ कोटी रुपये होतें व त्यांना ९.९६ कोटी रुपये ठोक नफा झाला होता. "घसारा, कर, गंगाजळी आणि ६% डिव्हिडंड ह्यांची तरतूद करून २ महिन्यांचा बोनस कामगारांना आणि कारकून वगैरे इतर नोकरांना देण्याइतकी रकम शिल्लक रहाते" असें इंडस्ट्रिअल कोर्टानें ठरविलें. नफा कमी झाला आहे, नवी यंत्रसामुग्री टाकण्यासाठीं रोकड रकमेची आवश्यकता आहे, इत्यादि मालक संघाचें म्हणणें कोर्टास पटलें नाहीं. १९४८ मध्यें कामगारांना ४½ महिन्यांच्या प्राप्तीइतका बोनस मिळाला होता.

---

**उसाची पाणीपट्टी वाढणार**

मुंबई सरकारनें आपल्या पाण्याचे दर निदान निरा कालव्याचे क्षेत्रांत तरी, ३३.३% वाढविण्याचें ठरविलें आहे. ही वाढ १५ फेब्रुवारी १९५१ पासून अंमलांत येईल आणि त्यानंतर एक वर्षानें ५०% वाढ होईल. चार वर्षांपूर्वी, म्हणजे १५ फेब्रुवारी १९४६ पासून पाण्याचे दर एकरीं ४५ रु. चे ६० करण्यांत आले होते व त्यास ६ वर्षांची मुदत होती. ही मुदत संपण्यापूर्वीच, १९५१ पासून एकरीं ८० रुपये व १९५२ पासून एकरीं ९० रुपये अशी पट्टी होणार असल्याचें समजतें. इतर पिकांना पुरविल्या जाणाऱ्या पाण्याचा आकारहि वाढविला जाणार किंवा नाहीं, हें अद्याप बाहेर आलेलें नाहीं. पाणीपट्टी बरोबर लोकल फंड पट्टीहि वाढणार, हें उघड आहे. लिफ्ट इरिगेशनचे दर कालव्याच्या पाण्याच्या दराशीं जोडलेले असल्यामुळें ते दरहि त्या प्रमाणांत वाढतील.

| कालव्याचा दर | लिफ्ट इरिगेशचा दर | |
|---|---|---|
| | ५० फुटांखालीं | ५० फुटांवर |
| रु. | रु. | रु. |
| ४५ | २२–८ | ७–८ |
| ६० | ३०–० | १५.० |
| ८० | ४०–० | २५.० |
| ९० | ४५–० | ३० |

---


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर

## नोटीस

या बँकेच्या सन १९५०–५१ सालाच्या हिशेबाची तपासणी करण्याकरतां येत्या वार्षिक साधारण सभेनें दोन हिशेब तपासनिसांची नेमणूक करावयाची आहे. तरी सदर जागांसाठी ज्यांस उमेद्वार म्हणून उभें राहावयाचें असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेच्या पुणें कचेरींत ता. ३१ जुलै १९५० रोजीं दुपारीं चार वाजण्यापूर्वी दाखल होतील, अशा बेतानें पाठवावेत. उमेद्वारानें अर्जांत आपलें संपूर्ण नांव, पत्ता व लायकी अवश्य नमूद करावींत. हिशेब तपासनिसांच्या नेमणुकीसंबंधीं बँकेनें केलेले नियम तिचे मुख्य कचेरींत कामाचे वेळांत पहावयास मिळतील.

पुणें. ता. १० जुलै १९५० मो. वि. रबडे.

मॅनेजिंग डायरेक्टर.


## दि पूना मर्चंट्स चेंबरची स्थापना

**कंपनी कायद्याखालीं नोंदणी**

दि पूना मर्चंट्स चेंबर ही संस्था स्थापन करण्यांत येत आहे. कंपनी कायद्याखालीं ती नोंदविली जाईल. सभासदांची जबाबदारी मर्यादित राहिली, तरी असोसिएशनच्या नांवाचे अखेर 'लिमिटेड' हा शब्द लावला जाऊं नये, ह्या दृष्टीनें लायसेन्ससाठीं मुंबई सरकारकडे अर्ज करण्यांत आला आहे.

व्यापार, कला, शास्त्रें, धर्म, इत्यादींच्या वृद्धीसाठीं संस्था काढण्यांत येत असली आणि तिच्या नफ्याचा विनियोग त्या उद्देशांच्या सिद्धीसाठींच करण्यांत येत असेल, सभासदांना डिव्हिडंड मिळण्याची संस्थेनें बंदी केली असेल, तर अशी संस्था मर्यादित जबाबदारीची कंपनी म्हणून नोंदतां येते आणि तिच्या नांवाच्या अखेर 'लिमिटेड' हा शब्द लावला नाहीं तरी चालतो, असें कंपनी कायद्याचें २६ वें कलम सांगतें. त्याबाबत सरकार योग्य त्या अटींवर लायसेन्स देतें. ह्या अटी त्या संस्थेवर बंधनकारक रहातात आणि सरकारास जरूर वाटलें तर त्या अटी मेमोरँडम व आर्टिकल्स ह्यांत नमूद केल्या पाहिजेत अशी संस्थेवर सक्ती करतां येते. संस्था नोंदण्यांत आली, म्हणजे लिमिटेड कंपनीचा सर्व नफातोटा तिला मिळूं शकतो.

---

## शेड्यूल्ड बँकांची तुलनात्मक परिस्थिति

| | ३०-६-१९५० | २३-६-१९५० | १–७–१९४९ | २२-८-१९४७ |
|---|---|---|---|---|
| | ( आकडे हजार रुपयांच आहेत ) | | | |
| १ 'डिमांड' देणीं | ५८८,७४,१७ | ५८४,५९,८४ | ५९५,६७,५१ | ६२५,०२,७१ |
| २ 'टाइम' देणीं | २७४,६५,१२ | २७४,३२,३७ | २७९,५३,२२ | ३०४,३३,३० |
| ३ एकूण रोकड | ४५,७४,४० | ३४,९३,६० | ४२,५८,६५ | ३६,०७,७७ |
| ४ रिझर्व्ह बँकेकडलि शिलका | ५१,४१,९३ | ५४,६८,७५ | ६६,४४,७९ | ९६,७३,७२ |
| ५ दिलेलीं कर्जें | ४४१,४४,२७ | ४४२,४३,४१ | ४४०,७०,५१ | ३५९,४७,६३ |
| ६ डिस्कौंट केलेलीं बिलें | ११,०३,०६ | १०,९२,३३ | १५,२०,३० | १५,१९,९८ |

---

**स्टेट ट्रॅन्स्पोर्टची सुधारणा**

मुंबई स्टेट ट्रॅन्सपोर्टच्या बसेस आतां एकूण १२,८४७ मैल लांबीच्या रस्त्यांवरून दररोज ८४,६५० मैल वहातुक करतात. बसेसची संख्या १,१९१ असून रोज १,४७,६०४ उतारूंची नेआण होते. रस्ते खराब असल्यामुळें गाड्यांची नासधूस फार होते. वर्कशॉप्सची संख्या अपुरी आहे. एका महिन्यांत १,१९१ बसेसच्या मिळून दोन स्प्रिंगा तुटाव्यात, परंतु हल्लींच्या परिस्थितींत दररोज एक ते पांच स्प्रिंगा तुटतात! इतर राज्यांच्या मानानें मुंबई राज्याचा रस्त्यांच्या बांधणीवरील खर्च कमी आहे. दापोडी येथें एक मध्यवर्ती वर्कशॉप बांधण्यांत येत आहे, त्यास ३५ लक्ष रुपये खर्च येईल. परदेशी तज्ज्ञ मिळविण्याची खटपट चालू आहे! स्टेट ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशन १ कोटी रुपये सुधारणांवर खर्च करणार आहे. त्यापैकीं ६५ लक्ष रुपये रस्त्यांसाठीं, १५ लक्ष रुपये बस स्टेशनांसाठीं व २० लक्ष रुपये नोकरांच्या रहाण्याच्या घरांसाठीं खर्चण्याचा विचार आहे.

### भारत-अमेरिका व्यापार

मुंबई येथील अमेरिकन कॉन्सलेटमधील व्यापारी प्रतिनिधी मि. पॉल गॅरेन ह्यांनीं भारत आणि अमेरिका ह्यांच्या दरम्यान होऊं शकणाऱ्या व्यापाराचें भवितव्य चांगलें असल्याचें मत व्यक्त केलें आहे. न्यूयार्कमधील कॉमर्स अँड इंडस्ट्रीज असोसिएशनपुढें ते बोलत होते. भारत आपला आर्थिक विकास करून घेऊं शकेल असें सांगून, भारत-अमेरिका व्यापारासंबंधीं कांहीं आंकडेवार माहितीही त्यांनीं दिली. ते म्हणाले, " १९३८ सालीं भारत आणि अमेरिका ह्यांनीं परस्परांत जितका व्यापार केला त्याच्या पांचपट व्यापार त्यांनीं १९४९ मध्यें केला. यंत्रें आणि वाहनें ह्यांच्या निर्यातींत सर्वांत अधिक वाढ झाली. १९३८ सालापेक्षां १९४९ मध्यें यंत्रें आणि वाहनें ह्यांची निर्यात दहापट जास्त झाली. उलटपक्षीं, भारतानें अमेरिकेला केलेल्या निर्यातींतही १५ पट वाढ झालेली आहे. भारतांतून अमेरिकेला चहा, काजूच्या बिया, चामडी व कातडी इत्यादी माल निर्यात केला जातो. भारताची आजची अतिशय निकडीची गरज म्हणजे शेतीच्या उत्पादनाची वाढ करणें ही आहे. भारतीय उद्योगधंद्यांची जुनी यंत्रसामुग्री बदलून त्याजागीं नवी बसविण्यांत येत आहे. रासायनिक खतें, कृत्रिम रेशीम, वाहनांना लागणारें सामान व हत्यारें, ह्या वस्तू तयार करणारे कारखाने निघत आहेत. ह्या बहुतेक कारखान्यांना अमेरिकेच्या कुशल तंत्रज्ञांची मदत आहे. "

### फोर्ड मोटार कंपनीचे नवे चेअरमन
### मागील तपश्चर्येचा आढावा

ग्रेट ब्रिटनमधील फोर्ड कंपनीचे नवे चेअरमन, सर रोलंड स्मिथ, ह्यांनीं मोटारच्या धंद्यांत प्रथम ४६ वर्षांपूर्वीं हंबर लि., कॉव्हेंट्री येथें प्रारंभ केला. जिग अँड टूल डिझाइनर, असिस्टंट वर्क्स मॅनेजर, अशीं कामें केल्यावर त्यांना बंगाल, बर्मा व आसाम ह्यांतील फोर्ड गाड्यांच्या विक्रीचे मॅनेजर नेमण्यांत आलें. पुढें इंग्लंडमधील फोर्ड कारखान्यांत ' रोडमन, ' ' चीफ रोडमन, ' ' ट्रक हेड, ' ' लिंकन खात्याचे प्रमुख ' ह्या जागीं त्यांची योजना झाली. १९२८ सालीं फोर्ड मोटार कंपनी लि. चे ते जनरल मॅनेजर झाले. ह्या जागीं ते १० वर्षें होते. त्या मुदतींतच डॅगेनहॅमचा कारखाना उभारण्यांत आला. युद्ध काळांत ह्या कारखान्यांत त्यांनीं लक्षावधी मोटारी, ट्रॅक्टर्स, ब्रेनगन कॅरिअर,वगैरे युद्धोपयोगी माल तयार केला, त्याचबरोबर त्यांनीं मँचेस्टर येथें १८,००० कामगार असलेल्या मोठ्या कारखान्याची उभारणी करून तेथें ३४,००० मर्लिन एरो एंजिनें बनविलीं. १९४४ सालीं ते ' सर ' झाले.

### हेल्थ इन्शुरन्स योजनेस विरोध

भारत सरकारनें पुरस्कारलेल्या एम्प्लॉईज हेल्थ इन्शुरन्स योजनेची प्रगति फारच मंदगतीनें होत आहे. दिल्ली व कानपूर येथें प्रथम ही योजना प्रयोगादाखल सुरू करण्याचें कॉर्पोरेशननें ठरवलें. परंतु कानपूर येथील मालकवर्गाचा त्यास विरोध आहे. ह्या योजनेमुळें कानपुरांतील ९०,००० कामगारांचा फायदा होईल. एकण खर्चाच्या दोन तृतीयांश, म्हणजे ३७½ लक्ष रुपये मालकवर्गास सोसावे लागतील. त्यांतले ३२ लक्ष रुपये कापडाच्या गिरण्यांचे वाट्यास येतील, कातड्याच्या धंद्यावर २½ लक्ष रुपये बसतील व बाकीच्यांना ३ लक्ष रुपयांची तरतूद करावी लागेल. आजच्या परिस्थितींत, कारखानदारांना एवढा बोजा सहन होणार नाहीं, असें मालकवर्गाचें म्हणणें आहे.


बेडेकर मसाले

Dr. Waman Gopal's Sarsaparilla
BEST BLOOD PURIFIER

**कूळ व शेतजमीन कायदा**

आवृत्ती दुसरी प्रसिद्ध झाली. किं ४ रु. कूळकायदा ( १९३९ ) आवृत्ति ३ री किं. ३ रु., तुकडेबंदी व जमीन एकत्रीकरण कायदा किं २ रु. भाडेनियंत्रण कायदा किंमत २ रु., शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४॥ रु., मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु., द्विभार्या-प्रतिबंधक कायदा ( आवृति ३ री ) किंमत १ रु., हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु., खंडपावत्यांचें पुस्तक ८ आणे.

पत्ता:-लॉ अॅकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २




उंची कपड्याचा व स्नानाचा
उत्तम साबण
निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (साता


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.